## जनसंपर्क विभाग

जळगाव १७, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेच्या वतीने दि. १८ व १९ सप्टेंबर रोजी "रसायनशास्त्र आणि तंत्रज्ञानातील नवीनतम  विकासासाठी जागतिक संधी (GOLD CT)" या विषयावर दुसरी अंतरराष्ट्रीय परिषद होणार असून यामध्ये ६५० पेक्षा अधिक संशोधक,तज्ज्ञ, उद्योजक व विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

रसायनशास्त्र प्रशाळेतील प्रोफेसर तथा विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी. माहुलीकर हे सप्टेंबर महिन्याअखेर सेवानिवृत्त होत असून त्यांच्या सेवेचा गौरव करण्यासाठी ही आंतरराष्ट्रीय परिषद होणार आहे. या परिषदेचे उद्घाटन बुधवार दि. १८ सप्टेंबर रोजी आयसीटी मुंबईचे माजी कुलगुरु प्रा.जी.डी.यादव यांच्या हस्ते होणार असून ते यावेळी बीजभाषण करणार आहेत. कुलगुरु प्रा. व्ही.एल.माहेश्वरी अध्यक्षस्थानी राहतील. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी ६५० जणांनी नोंदणी केली आहे. यामध्ये २०० पदव्युत्तर विद्यार्थी, २४० संशोधक विद्यार्थी, २०० अॅकेडमीशीयन, १० उद्योजक आदींचा समावेश आहे. परदेशातील ६ तज्ज्ञ देखील या परिषदेत सहभागी होतील. त्यामध्ये दक्षिण आफ्रिकेतील प्रा.श्रीकांता जोन्नलगड्डा, दक्षिण कोरीयातील प्रा. सोहन देओन, मेक्सीकोतील डॉ. मार्टीनेज, डॉ.प्रियंका मक्कर आदींचा समावेश आहे. सिनेट सभागृहात होणारा कार्यक्रम व परिषदेतील मान्यवरांचे व्याख्यान विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून प्रक्षेपित केले जाणार आहे. त्यामुळे जगभरातील विविध संशोधकांना याचा लाभ घेता येईल. साधारणपणे एक हजार व्यक्ती ऑनलाईन उपस्थित राहतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. परिषदेचे समांतर सत्र पर्यावरणशास्त्र प्रशाळेचे सभागृह, दृकश्राव्य सभागृह आणि रसायनशास्त्र प्रशाळेचे सभागृह या चार ठिकाणी होणार आहेत.

या परिषदेसाठी गुजरात, राजस्थान, उत्तरप्रदेश, हिमाचल प्रदेश, पंजाब, दिल्ली, जम्मु-कश्मीर, आंध्र प्रदेश, तेलंगणा,कर्नाटक,गोवा, मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील विविध विद्यापीठातून संशोधक, विद्यार्थी, शास्त्रज्ञ, प्राध्यापक उपस्थित राहणार आहेत. रसायनशास्त्रातील जवळपास २४ उपविषयांवर या परिषदेत चर्चा होणार आहे. या परिषदेत २२६ पोस्टर व ६० मौखिक शोधनिबंध सादर होणार आहेत. भारताच्या विविध प्रांतामधून येणाऱ्यांमध्ये डॉ.पी.पी. वडगावकर, प्रा.व्ही.आर.पाटील, डॉ.बुबन बॅनर्जी,डॉ.अंकुश बिरादार, प्रा.आर.के. शर्मा, प्रा.बाबासाहेब शंकपाळ, प्रा.के.के.शर्मा, डॉ.एस.व्ही.भोसले, प्रा.एन.के.कराडे, डॉ.दिनेश सावंत, डॉ.शेषनाथ भोसले,डॉ.एस.एल.सोनवणे, डॉ.साजल दास, डॉ.एस.एम.माने, प्रा.अविनाश कुंभार, डॉ. पंकज कोईनकर , डॉ.एस.एच.सोनवणे, डॉ.मिलिंद देशमुख, प्रा.नरिंदरसिंग, प्रा.बिश्वजित सिन्हा,डॉ.निरंजन येवले, प्रा.एन.एन.कराडे, डॉ.अपूर्बा, कोनेर, डॉ.बापूराव शिंगाटे, प्रा.राम माने, डॉ.डी.एम.बडगुजर, डॉ.रोहन एरंडे, आदींचा समावेश आहे.

परिषदेचा समारोप १९ सप्टेंबर रोजी दुपारी होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय विज्ञान शिक्षण आणि अणुसंधान संस्था (आयआयएसईआर) पुणे चे माजी वरीष्ठ प्रा. ए.ए. नातू हे उपस्थित राहणार आहेत. प्रा.पी.पी.माहुलीकर यांचा सत्कार या दिवशी होणार आहे. अशी माहिती प्रशाळेच संचालक प्रा.डी.एच.मोरे व निमंत्रक प्रा.डी.एस.दलाल यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव १७, (प्रतिनिधी) : केंद्र शासनाच्या युवक व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रा.से.यो. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वच्छता ही सेवा' या पंधरवडा निमित्त विद्यापीठाचे प्र-कुलगुरू व कुलसचिव यांच्या हस्ते आज मंगळवार दि. १७ रोजी वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विनोद पाटील व रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे उपस्थित होते. दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर, २०२४ या पंधरवड्यात स्वच्छता, संस्कार व वृक्षरोपणाचा कार्यक्रम रा.से.यो. विभागाच्या वतीने विद्यापीठात आयोजित करण्यात येणार आहे. त्याअंतर्गत विद्यापीठ एककातील रा.से.यो. स्वयंसेवकांनी विद्यापीठ परिसरातील प्लॅस्टीक कचरा व इतर कचरा गोळा केला, तसेच चालक दिनाचे औचित्य साधून विद्यापीठातील

वाहनचालकांकडून व रा.से.यो. स्वयंसेवकांकडून विद्यापीठ परिसरात वड, पिंपळ, सिताफळ, रामफळ व कडूलिंबांची अशी एकूण १०० झाडे लावण्यात आलीत. यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोज इंगोले व डॉ. कविता पाटील यांच्यासह रा.से.यो. स्वयंसेवक उपस्थित होते.

**बातमी नं. ३**

जळगाव १७, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रामार्फत एम.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता स्वागत समारंभाचे आयोजन तसेच भित्तीपत्रकाचे विमोचनाचे कार्यक्रम दि. १४ सप्टेंबर रोजी संपन्न झाला.

यावेळी प्रशाळेचे संचालक प्रा. म.सु. पगारे, अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे हे होते. यावेळी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. प्रा. अनिल डोंगरे यांच्या हस्ते भित्ती पत्रकाचे विमोचन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. डोंगरे यांनी विद्यार्थ्यांनी नवीन टेक्नॉलॉजीचा वापर करून आपल्या क्षमता व सृजनशीलतेचा वापर करून रोजगाराच्या संधी प्राप्त कराव्यात असे सांगितले. अध्यक्षीय समारोप करतांना प्रा. म.सु. पगारे यांनी विद्यापीठ हे ज्ञानाचा सागर असून जेवढे ज्ञान विद्यार्थ्यांना आत्मसात करता येईल तेवढे त्यांनी करावे असे सांगितले. विद्यार्थी योगेश पाटोळे, गुलाबसिंग पटले, प्रा. कृष्णा संदानशीव व प्रा. प्रिती सोनी, नेत्रा उपाध्ये, महेश सुर्यवंशी यांनी स्वलिखीत कवितांचे साहित्य सृजन भित्तीपत्रक तयार करण्यास सहभाग नोंदविला. यावेळी प्रशाळेतील विद्यार्थी व अध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन नेहा परदेशी व प्रज्ञा गायकवाड यांनी तर आभार सरगम तडवी यांनी मानले.

**बातमी नं. ४**

जळगाव १७, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात चालक दिनानिमीत्त विद्यापीठातील वाहनचालकांचा प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्याच्या अपर परिवहन आयुक्त यांच्याकडून दि. १७ सप्टेंबर हा चालक दिन म्हणून साजरा करण्याबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने विद्यापीठातील वाहनचालक अरविंद पाटील, मन्साराम राठोड, छोटू पाटील, दीपक मोरे, दगडू कोळी, चंद्रकांत पाटील, अभिलाल बागुल, गोरख बोरसे, विश्वनाथ ठाकरे, धर्मराज पाटील, मनोहर पाटील, सचिन बावीस्कर, अविनाश पाटील व राजेंद्र पाटील या कर्मचाऱ्यांचा पुष्प देऊन प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, सहायक कुलसचिव सविता सोनकांबळे, संजय पाटील, विठ्ठल पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण चंदनकर यांनी केले.

.................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १७ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता